जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४१३ दिनांक - ०१/१०/२०२४**

खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर

## खुनाच्या प्रयत्नातील पाहिजे आरोपीच्या आवळल्या मुसक्या

दि.१६/०९/२०२४ रोजी कोंढवा पोलीस ठाणे येथे अग्निशस्त्राचा वापर करून खुनाच्या प्रयत्नातील दाखल गुन्ह्यातील पाहिजे आरोपी मयूर उर्फ चिग्या दिगंबर वाघमारे, वय २२ वर्षे, रा सर्वे नं ४, लेन नं १, काकडेनगर, कोंढवा बु. पुणे हा स्वःताचे अस्थित्व व ओळख लपवून राहत आहे.अशी खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, कडील पोलीस अंमलदार विजय कांबळे व अमर पवार यांना बातमी मिळाल्याने सदर बातमीची पडताळणी करून मा. वरिष्ठाच्या परवानगीने शिवाजी पुतळा मांजरी, पुणे या ठिकाणी जावुन आरोपीचा शोध घेत असताना त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदार यांच्यासह सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले.

कोंढवा पोलीस ठाणे, गुरनं १०७०/२०२४, भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १०९, ३(५) आर्म ॲक्ट ३(२५), २७, ३५ या गुन्हयातील पाहिजे आरोपी **मयूर उर्फ चिग्या दिगंबर वाघमारे, वय २२ वर्षे, रा. सर्वे नं ४, लेन नं १, काकडेनगर, कोंढवा बु.** पुणे यास शिवाजी पुतळा, मांजरी बु. पुणे येथून ताब्यात घेवून पुढील तपासकामी कोंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर यांचे ताब्यात दिले आहे.

सदर आरोपीवर यापूर्वी वानवडी पोलीस ठाणे, गुरनं ४२०/२०२४ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३५२(३), आर्म ॲक्ट ३(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे,मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे),श्री. निखील पिंगळे,मा. सहायक पोलीस आयुक्त १, गुन्हे, श्री. गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेश संखे यांच्या सुचनेप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक अभिजीत पाटिल,पोलीस अंमलदार विजय कांबळे, अमर पवार, प्रफुल्ल चव्हाण, नितीन कांबळे व महिला पोलीस अंमलदार गितांजली जांभुळकर यांनी केली.


A|X